RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक १३३(२)] सोमवार, डिसेंबर २८, २०२० / पौष ७, शके १९४२ [पृष्ठे २९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३२४**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.१११/गृनिभू. — महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"दूरध्वनीचालक"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **दूरध्वनीचालक (सेवा प्रवेश) नियम, २०२०**" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, —

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "विभाग" म्हणजे महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

(ड) "माध्यमिक शालांत परीक्षा" म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शाळा *प्रमाणपत्र परीक्षा (यामध्ये शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत आहेत.)

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील “दूरध्वनीचालक” या पदावरील नियुक्ती पुढील व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(एक) ज्या उमेदवारांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गिय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) ज्यांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे;

(तीन) मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

आणखी असे की, ज्या उमेदवारांकडे दूरध्वनीचालकाचे प्रशिक्षण व अनुभव अशा दोन्ही गोष्टी असतील त्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल,

तसेच, आणखी असे की, निवड प्राधिकाऱ्याच्या मते ज्या उमेदवाराची वर्तणूक सौजन्यकारक व आवाज सुश्राव्य असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती, प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९७/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"विधी सल्लागार"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांस, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील विधी सल्लागार (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणता येईल.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) **"शासन"** म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) **"प्राधिकरण"** म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "विधी सल्लागार" या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये "उप विधी सल्लागार" हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींना त्या पदावरील नियमित सेवेचा सहा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असेल अशा व्यक्तींमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा ( आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९७/गृनिभू.-- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"उप विधी सल्लागार"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांस, " महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील उप विधी सल्लागार (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणता येईल.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "उप विधी सल्लागार" या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये "सहायक विधी सल्लागार" हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींना त्या पदावरील नियमित सेवेचा पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असेल अशा व्यक्तींमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा ( आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात , बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर, २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९७/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"सहायक विधि सल्लागार"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सहायक विधि सल्लागार (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, —

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी " म्हणजे कोणत्याही संविधिमान्य विद्यापीठाची पदवी.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "सहायक विधि सल्लागार" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) प्राधिकरणामध्ये विधि सहाय्यक हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींना त्या पदावरील नियमित सेवेचा पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असेल अशा व्यक्तींमधून पात्रता व जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन ;

किंवा

(ब) पुढील व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे -

(१) ज्या उमेदवारांचे वय खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षापेक्षा व मागासवर्गिय व्यक्तींसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसेल; आणि;

(२) ज्यांने कायद्याची पदव्युत्तर पदवी धारण केलेली असेल तसेच;

(३) ज्याला पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर, उच्च न्यायालय अथवा राज्यातील अन्य कनिष्ठ न्यायालयातील वकीलीचा विशेषत: भूधारणा (Land Tenures), मालमत्तेचे हस्तांतरण, घरबांधणी, मालकी हक्काचे फ्लॅट्स, सहकारी गृहनिर्माण संस्था आणि इतर प्राधिकरणाशी संबंधित असलेल्या कामांचा पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असेल.

परंतु, मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेली रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक तो अनुभव असलेले उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध नाहीत असे कोणत्याही वेळी निवड प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास अशा निवडीच्या बाबतीत निवड प्राधिकाऱ्यास अनुभवाच्या कालावधीबाबतची अट शिथिल करता येईल आणि अशा जातीमधील किंवा जमातीमधील योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनान्वये करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ५०:५० असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत वेळोवेळी करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा ( आवश्यक असल्यास किंवा भविष्यात अनिवार्य केल्यास ), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात , बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर, २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९७/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"विधि सहायक"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील विधी सहाय्यक (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी " म्हणजे कोणत्याही संविधिमान्य विद्यापीठाची पदवी.

३. प्राधिकरणाच्या विधि विभागातील विधि सहाय्यक या पदावरील नियुक्ती पुढील व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

(१) ज्या व्यक्तीचे वय खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गिय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि;

(२) ज्याने कायद्याची पदवी धारण केलेली असावी तसेच;

(३) ज्याने पदवी प्राप्त केल्यानंतर सॉलिसीटर फर्ममधील अथवा शासनाच्या विधि विभागामध्ये अथवा सरकारी उपक्रमामध्ये किंवा राज्यातील कोणत्याही न्यायालयामध्ये कायदेविषयक मसुदे तयार करण्याचा/ वकिलीचा ३ वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीचा अनुभव धारण केलेला असेल.

परंतु, मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेली रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक तो अनुभव असलेले उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध नाहीत असे कोणत्याही वेळी निवड प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास अशा निवडीच्या बाबतीत निवड प्राधिकाऱ्यास अनुभवाच्या कालावधीबाबतची अट शिथिल करता येईल आणि अशा जातीमधील किंवा जमातीमधील योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत वेळोवेळी करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा ( आवश्यक असल्यास किंवा भविष्यात अनिवार्य केल्यास ), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.१०८/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"सक्षम प्राधिकारी"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सक्षम प्राधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) " विभाग" म्हणजे शासनाचा गृहनिर्माण विभाग.

३. प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी या पदावरील नियुक्ती शासनाच्या उपजिल्हाधिकारी किंवा दिवाणी न्यायाधीश यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल असे पद धारण करणाऱ्या किंवा असे पद ज्याने धारण केले असेल अश्या अधिकाऱ्यामधून शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय / संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक : सेप्रनि-२०२०/प्र.क्र.१०९/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"जनसंपर्क अधिकारी"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील जनसंपर्क अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" म्हणजे एखाद्या संविधिमान्य विद्यापीठाची पदवी.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "जनसंपर्क अधिकारी" या पदावरील नियुक्ती पुढील व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(एक) ज्या उमेदवारांचे वय खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा,

(तीन) ज्यांनी पत्रकारितेमधील पदवी किंवा पदविका धारण केलेली असेल,

(चार) वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर उपरोक्त पदासाठी ५ वर्षांचा अनुभव खालील प्रमाणे असेल,

(अ) बातमीदारीच्या अनुभवासह पत्रकारिता व जनसंपर्क किंवा

(ब) दैनंदिन वर्तमानपत्रात किंवा नामांकित वृत्त संस्थेमध्ये (न्युज एजन्सीमध्ये) काम केलेले असावे, किंवा

(क) शासकीय /निमशासकीय/सुप्रस्थापित कंपनीमध्ये संपादकीय विभागात किंवा जनसंपर्क विभागात पत्रकारिता किंवा जनसंपर्काशी संबंधित काम केलेले असावे.

उच्चतम शैक्षणिक अर्हता व असाधारण अनुभव असणाऱ्या उमेदवारास वयोमर्यादा किंवा अनुभव किंवा दोन्ही शिथिल करता येईल.

तसेच, मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेली रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक तो अनुभव असलेले उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध नाहीत असे कोणत्याही वेळी निवड प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास अशा निवडीच्या बाबतीत निवड प्राधिकाऱ्यास अनुभवाच्या कालावधीबाबतची अट शिथिल करता येईल आणि अशा जातीमधील किंवा जमातीमधील योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.१०९/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**मुख्य जनसंपर्क अधिकारी**" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील मुख्य जनसंपर्क अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास अधिनियम, १९७६(सन १९७७ चा महा. अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मुख्य जनसंपर्क अधिकारी" या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये "जनसंपर्क अधिकारी" हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींना त्या पदावरील नियमित सेवेचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव आहे अशा व्यक्तीला पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन करण्यात येईल.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९८/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**उप समाज विकास अधिकारी**" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील उप समाज विकास अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" म्हणजे एखाद्या संविधिमान्य विद्यापिठाची पदवी.

३. या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील उप समाज विकास अधिकारी या पदावरील नियुक्ती पुढील रितीने नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(१) ज्या उमेदवारांचे वय खुल्या वर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल ; आणि;

(२) ज्याने सामाजिक कार्यामधील पदव्युत्तर पदवी (Masters Degree in Social Work) किंवा शासनाने त्या पदवीशी समतुल्य जाहीर केलेली कोणतीही इतर अर्हता धारण केलेली आहे तसेच;

(३) ज्याने उप नियम २ मध्ये नमूद पदवी प्राप्त केल्यानंतर समाज विकासाच्या क्षेत्रातील (field of Community Development) ३ वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीचा अनुभव धारण केलेला आहे.

तथापि, ज्यांच्याकडे असाधारण अर्हता किंवा अनुभव या दोन्ही बाबी असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत निवड प्राधिकाऱ्याच्या शिफारशीवरून वयोमर्यादा किंवा अनुभवाचा कालावधी किंवा या दोन्ही बाबी शिथिल करता येतील :

परंतु, मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेली रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक तो अनुभव असलेले उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध नाहीत असे कोणत्याही वेळी निवड प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास अशा निवडीच्या बाबतीत निवड प्राधिकाऱ्यास अनुभवाच्या कालावधीबाबतची अट शिथिल करता येईल आणि अशा जातीमधील किंवा जमातीमधील योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने याबाबतीत वेळोवेळी करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास किंवा भविष्यात अनिवार्य केल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात , बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९८/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील " **समाज विकास अधिकारी**" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील समाज विकास अधिकारी, (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील समाज विकास अधिकारी या पदावरील नियुक्ती, उपसमाज विकास अधिकारी हे पद धारण करणाऱ्या व त्या पदामधील किमान चार वर्षाची नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल,

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ डिसेंबर २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९९/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"सर्व्हर ॲन्ड नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:-

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सर्व्हर ॲन्ड नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" म्हणजे एखाद्या संविधिमान्य विद्यापिठाची पदवी.

३. प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी सेवेतील "सर्व्हर ॲन्ड नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर" या पदावरील नियुक्ती खालील व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(एक) ज्या व्यक्तीचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ पेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) ज्या व्यक्तीने संगणक अभियांत्रिकी / संगणक तंत्रज्ञान/ संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी/ माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकीमधील बी.ई./बी.टेक पदवी किंवा बी.एससी (आयटी) किंवा एमसीए ही अर्हता धारण केलेली असेल तसेच;

(तीन) सिस्को सर्टिफाईड नेटवर्क (सी.सी.एन.ए) प्रमाणपत्र किंवा सर्व्हर (विंडोज/लिनिक्स) ॲडमिनिस्ट्रेशन मधील ओ.ई.एम. प्रमाणपत्र धारण केलेले असेल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

